लोणार सरोवराच्या संरक्षण व संवर्धनाकरिता वनक्षेत्रात उपाययोजना सुचविण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. लवेसू-०६१९/प्र.क्र.३५/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २८ जून, २०१९

प्रस्तावना :-

सन २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात दि.२८.०६.२०१९ रोजी विधानसभेत सर्वश्री. डॉ. संजय रायमुलकर, व इतर विधान सभा सदस्य यांनी विधान सभा नियम १०५ अनुसार " वैज्ञानिकदृष्ट्या अतिशय महत्वाचे असणारे बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवरातील क्षारयुक्त खारे पाणी झपाट्याने घटत आहे... " या विषयावर उपस्थित लक्षवेधी सूचनेवर वन विभागाने करवायाच्या कामाच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. सदर चर्चेदरम्यान मा.मंत्री (वने) यांनी लोणार सरोवराच्या पाण्याच्या पातळी कमी होऊ नये व याकरिता लोणार सरोवराच्या परिसरात वनक्षेत्रात वनविभागामार्फत ध्यावयाच्या उपाययोजना सुचविण्याकरिता सर्वश्री. डॉ. संजय रायमुलकर यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापित करून समिती मार्फत सुचविलेल्या उपाययोजनांचे तांत्रिक दृष्ट्या पडताळणी करून त्याची अंमलबजावणी केली जाईल असे आश्वासन दिले आहे.त्या अनुषंगाने शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

लोणार सरोवराच्या संरक्षण व संवर्धनाकरिता वनक्षेत्रात उपाययोजना सुचविण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

१.	श्री.संजय रायमुलकर, विधान सभा सदस्य.	अध्यक्ष
२.	मुख्य अधिकारी, नगर परिषद लोणार.	सदस्य
३.	उप विभागीय अधिकारी, मेहकर.	सदस्य
४.	वरिष्ठ भूवैज्ञानिक(प्र), भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा बुलडाणा.	सदस्य
५.	निरीक्षक, आर्कियालॉजिकल सर्वे ऑफ इंडीया.	सदस्य
६.	विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) अकोला.	सदस्य सचिव

२. सदर समिती खालील मुद्दयांबाबत उपायायोजना सुचवेलः-

- लोणार सरोवराच्या परिसरात वनक्षेत्रात प्रभावी जल संधारण करणे.
- लोणार सरोवराच्या पाण्याची पातळी स्थिर ठेवणे.
- लोणार सरोवराच्या सभोवती असलेल्या वनक्षेत्रातील नैसर्गिक झऱ्यांचे संरक्षण करणे.
- अभयारण्य क्षेत्रातील वनांचा व वन्यजीव अधिवासाचा विकास करणे

३. समितीच्या कार्यकक्षेप्रमाणे कामे प्रभावीपणे राबविण्याकरिता समिती आवश्यकतेनुसार तज्ञ व्यक्तींचे सहाय्य घेऊ शकते. समितीने त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल शासनास १ महिन्याच्या कालावधीत सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२८१६२६२६७०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.06.28 16:33:51 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर
४. श्री.संजय रायमुलकर ,विधान सभा सदस्य.
५. जिल्हाधिकारी ,बुलडाणा.
६. विभागीय वन अधिकारी(वन्यजीव) अकोला.
७. निरीक्षक, आर्कियालॉजिकल सर्वे, ऑफ इंडीया.
८. उप विभागीय अधिकारी , मेहकर.
९. मुख्य अधिकारी, नगर परिषद, लोणार
१०. वरिष्ठ भूवैज्ञानिक(प्र),भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बुलडाणा
११. फ-१/२ ,ब कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

******